# तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य

३ महापालिका मार्ग , पत्र पेटी क्रमांक : १९६७ मुंबई - ४००००१

दूरध्वनी क्रमांक - २२६२०६०१,२२६९०६०२,२२६४११५०/५१ फॅक्स् नं.२२६९२१०

**E_mail desk15@dtemaharashtra.gov.in,**

**Website :www.dtemaharashtra.gov.in**

क्रमांक-१५ /तंशिसं/अर्थसं/इबीसी/१६-१७/२०३

दिनांक- 13 JAN 2017

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय:- " राजर्षी छत्रपती शाहु महाराज शैक्षणिक शुल्क् प्रतिपुर्ती योजना " व
" डॉ पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना "

---

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन भरलेले अर्ज छाननी करणेबाबत.

संदर्भ:-१) शासन निर्णय क्रमांक टीईएम -२०१५ /प्र. क्र.२१९ / तांशि-४ दिनांक ३१ मार्च २०१६

२) शासन निर्णय क्रमांकटीईएम-२०१६/प्र.क्र.५०१/तांशि-४ दिनांक१३ऑक्टोबर २०१६

<u>१)" राजर्षी छत्रपती शाहु महाराज शैक्षणिक शुल्क् प्रतिपुर्ती योजना " शैक्षणिक वर्ष २०१६-१७</u>

उपरोक्त् विषयाबाबत कळविण्यात येते की, आपल्या अधिनस्त् व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी शासकीय व शासन अनुदानित (शासकीय अभिमत विद्यापीठांसह ) व खाजगी विनाअनुदानित ( खाजगी अभिमत /स्वयं अर्थसहाय विद्यापीठ वगळुन) व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये/ तंत्रनिकेतनामध्ये शासनाच्या सक्षम प्राधिका-यामार्फत शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये केंद्रिभूत प्रवेश प्रकियेद्वारे प्रवेश घेंतलेल्या आर्थिकदुर्बल घटकातील विद्यार्थ्याकरीता " राजर्षी छत्रपती शाहु महाराज शैक्षणिक शुल्क् प्रतिपुर्ती योजना " करीता संदर्भिय शासन आदेशामधील अटि व शर्तीनुसार शैक्षणिक शुल्क् प्रतिपुर्तीकरीता संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन माहिती अर्ज विद्यार्थ्यांनी भरलेले आहेत. विद्यार्थ्यांनी संस्थेंकडे अर्जासोबत आवश्यक शैक्षणिक कागदपत्रे सादर करावयाची आहेत . तसेच संस्थांनी संदर्भिय शासन आदेशामध्ये नमुद अटी व शर्तीनुसार उदा. शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्रे , उत्पन्नाचे प्रमाणपत्र, महाराष्ट्र / वादग्रस्त् महाराष्ट्र कर्नाटक बॉर्डर राज्याचे अधिवास प्रमाणपत्र, शैक्षणिक शुल्काची पावती , विद्यार्थी पालकाचे प्रतिज्ञापत्र इत्यादिबाबत सर्व शैक्षणिक कागदपत्रे विद्यार्थ्यांच्या अर्जासोबत प्राप्त् करुन घ्यावी व ऑनलाईन छाननी करावी, तसेच शासन आदेशामधील अटी व शर्तीनुसार विद्यार्थ्यांचे अर्ज छाननी

संस्थांनी संस्थास्तरावर केल्यानंतर सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या स्तरावर छाननी समिती गठीत करुन विद्यार्थ्यांच्या अर्जाची परिपुर्ण छाननी करुन तदनंतर विद्यार्थ्यांची ऑनलाईन छाननी मध्ये पात्र /अपात्र संगणकप्रणालीवर नोंद घ्यावी . सदर अर्जांची छाननी दिनांक २५/०१/२०१७ पर्यंत पुर्ण करुन सर्व माहिती अद्यावत ठेवावी जेणे करुन शासनाकडून तरतुद प्राप्त् होताच संस्थेच्या खात्यामध्ये इसीएसद्वारे रक्कम जमा करणे सुलभ होईल

२) " डॉ पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना " शैक्षणिक वर्ष २०१६-१७

शासनाने निर्धारित केलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना शासकीय , शासन अनुदानित व विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये व तंत्रनिकेतने मध्ये प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्याचे पालक सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केल्याप्रमाणे अल्पभुधारक शेतकरी आहेत किंवा ज्यांचे पालक नोंदणीकृत मजुर आहेत अशा शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये प्रवेश घेतलेल्या/शिकत असलेल्या नियमित विद्यार्थ्यांनी " डॉ पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना " ऑनलाईन माहिती अर्ज भरलेले आहेत यासाठी शासनाकडे मार्गदर्शनास्तव प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे . अशा विद्यार्थ्यांचे अर्ज संस्थांनी आवश्यक शैक्षणिक कागदपत्रे, विद्यार्थ्यांकडून प्राप्त करुन घ्यावेत याबाबत शासनाकडून मार्गदर्शन प्राप्त् होताच सुचना देण्यात येतील .

उपरोक्त् संदर्भिय शासन आदेशातील अटी व शर्तीनुसार संस्थांनी ऑनलाईन विहित कालावधीत छाननी करुन आवश्यक कागदपत्रे आपल्या कार्यालयास सादर करण्याबाबत आपल्या अधिनस्त् संस्थांना कळविण्यात यावे.

सर्व विभागीय कार्यालयांना सुचित करण्यात येते की, सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय हे सदर योजनेकरीता सक्षम प्राधिकारी असल्याने विद्यार्थ्यांच्या तसेच संस्थांच्या अडचणी असल्यास त्याबाबत संचालनालयाशी ईमेलवर संपर्क साधून विहित कालावधीत निराकरण करुन घ्यावे. विद्यार्थी /संस्थांना थेट संचालनालयात पाठविण्यात येऊ नये. तसेच विभागीय कार्यालयांना कामकाजाच्या सुलभतेकरीता छाननी अधिका-यांसाठी युजर आयडी व पासवर्ड सुविधा देण्यात आलेली आहे . सदर सुविधेचा वापर करुन छाननी प्रक्रीया विनाविलंब विहित मुदतीत करावी.

(डॉ सुभाष महाजन )
संचालक
तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य मुंबई

. प्रती :- १) मा. कुलगुरु / कुलसचिव. सर्व शासकीय विद्यापीठे . महाराष्ट्र राज्य

पृष्ठांकन क्र:-विकाअ/शिक्षण/शिष्यवृत्ती/२०१७/176
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक 20 JAN 2017

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रत :-

१) प्राचार्य, सर्व शासकीय/अनुदानित/विना-अनुदानित संस्था, अमरावती विभाग, अमरावती यांना कळविण्यात येते की, वरील पत्राच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करावी.

२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.